प्रेसनोट दि. 19/05/2026

**अॅन्टी करप्शन ब्युरो, पुणे कडून भोर तालुक्यातील गवडी गावाचे ग्रामविकास अधिकारी, खाजगी इसम व सेवानिवृत्त विस्तार अधिकारी यांचेविरूध्द लाच मागणी व लाच स्विकारलेप्रकरणी कारवाई केलेबाबत.**

| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | पुणे घटक |
|---|---|
| पोलीस स्टेशन व गुन्हा नोंद क्रमांक | भोर पोलीस स्टेशन, पुणे ग्रामीण |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन 1988 चे कलमान्वये. |
| तक्रारदार | पुरूष वय 56 वर्षे |
| आरोपी लोकसेवकाचे नाव व कार्यालय | 1) महादेव नामदेव सालगुडे वय 48 वर्ष,पद -ग्रामविकास अधिकारी, ग्रामपचायत गवडी,तालुका भोर, जिल्हा -पुणे, सध्या रा.- रास्तेज बिल्डिंग सातवा माळा भोलावडे तालुका भोर जिल्हा पुणे. **वर्ग 3**<br>2) किसन रामचंद्र ठोसर वय 52 वर्ष खाजगी इसम राहणार मुक्काम पोस्ट शिंद तालुका भोर जिल्हा पुणे.<br>3) दत्तात्रेय दादासाहेब खंडाळे वय वर्ष 58 सेवानिवृत्त विस्तार अधिकारी पंचायत समिती भोर तालुका भोर जिल्हा पुणे. रा.ठी. श्रीकृष्ण अपार्टमेंट, ए विंग, फ्लॅट नंबर 100, रुई तालुका बारामती जिल्हा पुणे. (सेवानिवृत्त तारीख 31/03/2026) |
| सुरवातीची लाच मागणी | रू.5,000/- (पाच हजार रूपये) |
| पडताळणी दरम्यान लाच मागणी | रू.15,000/- (पंधरा हजार रूपये) |
| पडताळणी दिनांक | दि. 09/04/2026 रोजी व दि. 22/04/2026 रोजी |
| स्वीकारलेली लाच रक्कम | रू.15,000/- (पंधरा हजार रूपये) |
| सापळा दिनांक | दि. 19/05/2026 रोजी 13.07 वा. |
| ठिकाण | किवत गावचे हद्दीत भोर-मोहोरडे रोडलगत, ता. भोर, जि. पुणे. |
| सापळा अधिकारी यांचे नाव व पद | श्रीमती आसावरी शेडगे, पोलीस निरीक्षक, लाप्रवि, पुणे (मो.क्र. 8425808058) |
| तपास अधिकारी यांचे नाव व पद | श्रीमती निता मिसाळ,सहा.पोलीस आयुक्त,लाप्रवि,पुणे (मो.क्र. 9822214414) |

**थोडक्यात माहिती :-** यातील तक्रारदार हे व्यवसायाने शेती करीत असून तक्रारदार यांना सन 2024-2025 मध्ये महाराष्ट्र शासनातर्फे घरकुल मंजूर झाले आहे. दिनांक 28/2/25 रोजी तक्रारदार यांना त्यांच्या घरकुल मंजुरीचा पहिला हफ्ता त्यांच्या पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मधील खातेवर जमा झाला आहे. त्यानंतर तक्रारदार यांनी त्यांच्या घराचे बांधकाम सुरु करून फॉउंडेशन पर्यंत काम पूर्ण केले त्यानुसार आरोपी लोकसेवक सालगुडे यांनी तक्रारदार यांच्या घराच्या बांधकामचे इंजिनिअर मार्फत फोटो काढून पंचायत समिती भोर येथे अहवालाने सादर केले.

दि.01/04/2026 रोजी तक्रारदार त्यांच्या घरकुलच्या दुसऱ्या हफ्त्याची चौकशी करण्याकरिता पंचायत समिती भोर येथे गेले असता त्याठिकाणी संबंधित क्लार्ककडून तक्रारदार यांना त्यांच्या गवडी गावचे ग्रामसेवक सालगुडे यांनी त्यांचा घरकुलचा दुसरा हफ्ता प्रलंबित ठेवण्यास सांगितले असल्याचे समजले. म्हणून तक्रारदार यांनी लोकसेवक सालगुडे यांची भेट घेतली असता लोकसेवक सालगुडे यांनी तक्रारदार यांच्या घरकुलचा दुसरा हफ्ता खात्यामध्ये जमा करण्याकरिता 5,000/- रुपयाची लाचेची मागणी केली म्हणून तक्रारदार यांनी दि. 06/04/2026 रोजी अँटी करप्शन ब्युरो, पुणे येथे दिली होती.

तक्रारदाराने दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने दि.9/04/26 रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने लाच मागणी पडताळणी कारवाई केली असता आरोपी महादेव सालगुडे यांनी तक्रारदार यांचेकडे त्यांच्या घरकुलचा दुसरा हफ्ता खात्यामध्ये जमा करण्यासाठी सेवानिवृत्त विस्तार अधिकारी खंडाळे व सेवानिवृत्त विस्तार अधिकारी गोगरे यांच्याकरिता प्रत्येकी 5,000 असे दोघांसाठी एकूण 10,000/- रुपये व स्वतःकरिता 5,000/-रुपयाच्या लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले.

लोकसेवक महादेव सालगुडे यांनी सेवानिवृत्त विस्तार अधिकारी खंडाळे व गोगरे यांच्या करीता 10,000/- रुपयाची मागणी केल्याने सेवानिवृत्त विस्तार अधिकारी खंडाळे आणि गोगरे हे कोण आहेत व यांचा तक्रारदाराच्या घरकुलाच्या प्रस्तावाशी काय संबंध आहे याबाबत तक्रारदाराकडून माहिती घेतली असता त्यांनी हे दोन्ही विस्ताराधिकारी सेवानिवृत्त झाले असून ज्यावेळी ते भोर पंचायत समितीमध्ये नेमणुकीस होते त्यावेळी तक्रारदाराच्या घरकुलाच्या प्रस्तावाची चौकशी त्यांच्याकडे देण्यात आली होती अशी माहिती मिळाली. त्यानंतर सेवानिवृत्त विस्तार अधिकारी खंडाळे यांच्याकडे पडताळणी केली असता श्री खंडाळे यांनी तक्रारदार यांना ग्रामविकास अधिकारी सालगुडे यांना 5,000 रुपये लाच देण्यास प्रोत्साहन दिल्याचे निष्पन्न झाले.

दि.22/4/2026 रोजी तक्रारदार यांना लोकसेवक सालगुडे यांना त्यांच्या मागणीप्रमाणे पाच हजार रूपये देण्यासाठी पाठवले असता लोकसेवक सालगुडे यांनी तक्रारदार यांच्याकडे पंधरा हजार रूपये आहेत काय?अशी विचारणा केली त्यावर तक्रारदार यांनी 5,000 रूपये आणले असल्याचे सांगितले होते त्यानंतर लोकसेवक सालगुडे यांनी पाच हजार रूपयात काम होणार नाही खंडाळे आणि गोगरे (सेवानिवृत्त विस्तार अधिकारी) यांना पण प्रत्येकी 5,000 रूपये असे दोघांचे 10,000/- रूपये द्यावे लागतील व स्वतःसाठी 5,000 असे एकूण तक्रारदाराकडे 15,000/- रूपयाची लाच मागितल्याचे निष्पन्न झाले.

यातील तक्रारदार यांचेकडे लाच मागणी झाल्यानंतर आज दि.19/05/2026 रोजी करण्यात आलेल्या सापळा कारवाई दरम्यान तक्रारदार यांनी आरोपी लोकसेवक क्रमांक 1 यांच्याकडून करण्यात आलेल्या मागणीप्रमाणे 15,000/- रूपयाची लाच रक्कम आरोपी महादेव सालगुडे यांच्याकडे देऊ केली असता आरोपी लोकसेवक यांनी ती लाच रक्कम लोकसेवकासोबत असलेल्या आरोपी क्र.2 किसन ठोसर यांच्याकडे देण्यास सांगितली असता आरोपी क्रं 2 याने तक्रारदाराकडून 15,000/-रूपये लाचेची रक्कम स्वीकारली असून दोन्ही आरोपींना किवत गावाच्या हद्दीत भोर मोहुर्डे रोडलगत 13:07 वाजता रंगेहात पकडण्यात आले.

वरील तिन्ही आरोपीना ताब्यात घेतले असून त्यांच्याविरूद्ध विरूद्ध भोर पोलीस ठाण्यामध्ये भ्रष्टाचार प्रतिबंधक कायदा अधिनियम 1988 अन्वये गुन्हा नोंद करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

**सदरची कारवाई पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक श्री.शिरीष सरदेशपांडे, ला.प्र.वि. पुणे परिक्षेत्र, पुणे व अपर पोलीस अधीक्षक श्री. अजीत पाटील, ला.प्र.वि. पुणे, अपर पोलीस अधीक्षक श्री. अर्जुन भोसले, ला.प्र.वि. पुणे, यांचे मार्गदर्शनाखाली पुणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केली. लोकसेवक शासकीय अधिकारी / कर्मचारी किंवा त्यांच्यावतीने खाजगी इसम (एजंट) हे कोणतेही शासकीय काम करून देण्यासाठी कायदेशीर फी व्यतिरिक्त अन्य लाचेची मागणी करीत असल्यास त्याबाबत तात्काळ लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे कार्यालयास खालील क्रमांकवर सपर्क साधण्याचे आवाहन श्री. शिरीष सरदेशपांडे, पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि. पुणे (मो.क्र. 9823167154) तसेच अपर पोलीस अधीक्षक-1 श्री. अजीत पाटील, ला.प्र.वि.,पुणे (मो.क्र. 9029030530) यांनी केले आहे.**

1) **ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे- दुरध्वनी क्रमांक** -020-26122134, 26132802, 26050423, **9403781064**
2) **व्हॉट्स-ॲप क्रमांक** - 9403781064 (पुणे), 9930997700 (मुंबई)
3) **ई-मेलआयडी - पुणे** dyspacbpune@mahapolice.gov.in
4) **वेबसाईट** - www.acbmaharashtra.gov.in
5) **ऑनलाईन ॲप तक्रार** - www.acbmaharashtra.net.in



**दयानंद गावडे**
सहा.पोलीस आयुक्त / पो. उप अधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे.